नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २४/०२/२०२६ (मंगळवार )

## अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद
## ६ आरोपी अटक, ६२ गोवंश जनावरांची सुटका
## ४९ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २४/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयांवर कारवाई कामी कन्हान उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्तबातमीदाराने माहीती दिली की, गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे .मिळालेल्या माहीतीच्या आधारे नमुद पथकाने सतर्क पेट्रोलींग करीत मौजा वडोदा उड्डाण पुलाचे उताराचे पुर्वी हायवे रोडवर नाकाबंदी केली असता एक संशयीत ताडपत्रीने झाकलेला १२ चक्का ट्रक क्रमांक एम ३४ ए व्ही ०३७२ हे मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता चालकासह तीन आरोपी मिळुन आले. त्यांना नाव पत्त विचारले असता १) चालक आरोपी नामे **शितलसिंग रामलखन राठोड, वय ४१ वर्ष, रा. टेकानाका, नागपुर चलकासह मिळुन आलेले आरोपी २) इब्राहिम कुरेशी बाबु कुरेशी, वय ३४ वर्षे,रा पोस्टे यशोधराच्या मागे, नागपूर, आणि ३) अभय चंदनलाल यादव, वय ३२ वर्षे, रा मांजरी, नाका क्रं २ नागपुर अशी माहीती समजली. नमुद आरोपीतांना ताब्यात घेतले.** पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **२९ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. तसेच नमुद पथकाने उमरी फाट्याजवळ हायवे वर नाकाबंदी केली असता एक संशयीत ताडपत्रीने डाला झाकलेला आयशर ट्रक क्रमांक एम ४० सीटी २०७४ हे मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता चालकासह तीन आरोपी मिळुन आले. त्यांना नाव पत्त विचारले असता १) **चालक आरोपी नामे आमीर अली असलम अली, वय ३० वर्ष रा. कमर कॉलनी, कामगार नगर, नागपुर चलकासह मिळुन आलेले**

**आरोपी २) रिझवान शेख इल्लु शेख , वय २४ वर्षे,रा ताजनगर, नागपूर, आणि ३) शाहरूखउद्दीन शेख वलीउद्दीन शेख , वय २३ वर्षे,रा पिलीनदी,मांजरी, नगापुर अशी माहीती समजली. नमुद आरोपीतांना ताब्यात घेतले.** पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **३३ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. दोन्ही वाहनातील गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन, चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयीतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद दोन्ही वाहने किंमती किंमती ४०,००,००० /—रूपये आणि ६२ गोवंश जनावरे किंमती ९,३०,००० /—रूपये असा एकुण ४९,३०,००० /—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या जनावरांना ज्ञान फाउंडेशन लाखनी या गोशाळेत देखभालीकरीता दाखल करण्यात आले. नमुद ६ आरोपीतांना अटक करण्याची प्रक्रीया सुरू आहे.**



# १२.६८ किलो गांजा सह ४ लाख १४ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, १ आरोपी अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :– दिनांक २४/०२/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे पथक उमरेड उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना उमरेड त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली. नमुद पथकाला पेट्रोलींग दरम्यान उमरेड ते नागपुर रोडवर **आरोपी आकाश युवराज पंचभाई, वय. ३० वर्षे रा. पिपंळगाव निपानी ता.पवनी जि.भंडारा** हा एका लाल रंगाच्या विना क्रमांकाच्या बुलेट वर एक काळ्या रंगाच्या मोठी बॅग व आपल्या पाठीला एक मोठी काळ्या रंगाची बॅग लटकवुन वेगाने जातांना दिसुन आला. त्याचे दिशेने पथकाने आपले शासकिय वाहन नेले असता त्याने वेगाने आपल्या मोटार सायकलने पळ काढला. पोलीसांचा संशय बळावल्याने अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथकाने पाचगाव पोलीस चौकीत हजर पोलीस अंमलदारांना त्याबाबत माहीती देवुन त्यांचे मदतीने नमुद आरोपीला कुही फाटा येथे ताब्यात घेतले. पोलीसांनी पंचासमक्ष त्याची आणि कडील २ बॅगची झडती घेतली अंमली पदार्थ गांजा मिळुन आला.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन अंमली पदार्थ गांजा १२.६८ किलोग्रॅम किंमती २,५३,६००/–रुपये , विनाक्रमांकाची बुलेट मोटरसायकल आणि मोबाईल असा एकुण ४,१४,६०० /– रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थ गांजा पुरवाठा करणारा आरोपीबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली असुन पोलीस त्याचा शोध घेत आहे.**

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कुही येथे कलम ८(क), २० (ब) (ii) (ब) ,२२,२९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, १० लाख ८८ हजार ३४४ रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर:— दिनांक २३/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई कामी पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीस पथकाला गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, काटोल ते नागपूर रोड कळमेश्वर मार्गे महिंद्रा झायलो या वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील काटोल ते नागपूर रोड कळमेश्वर मार्गावर नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान महिंद्रा झायलो वाहन क्रमांक एम एच ४० के आर ०३२४ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. प्रतिबंधित सुगंधित तंबाखू वाहतूक करणारे **वाहन मालक आरोपी क्र. १) नामे अमित राजेंद्र प्रसाद गुप्ता, वय ३४ वर्ष, राहणार त्रिमूर्ती नगर, एनआयटी**

**गार्डन, जवळ नागपूर वाहन चालक २) संतोष मोहन गुप्ता, वय ३४ वर्ष, राहणार त्रिमूर्ती नगर, नागपूर** यांना ताब्यात घेवुन वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता **महिंद्रा झायलो वाहनामध्ये प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) वेगवेगळया कंपनीचे सुगंधीत तंबाखु वजन ५७८.३ किलोग्रॅम किंमती ३,४८,३४४/— रुपये २) एक महिंद्रा झायलो वाहन क्रमांक एम एच ४० के आर ०३२४ किंमती ७,००,०००/— रुपये ३) ०२ अँड्रॉइड मोबाईल फोन किंमती ४०,०००/— रूपये असा एकूण किंमती १०,८८, ३४४/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

नमुद आरोपींतांविरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**



# पोलीस ठाणे जलालखेडा हद्दीतील मौजा — उमठा (पारधी बेडा), हिवरमठ, शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या ०८ आरोपीतांविरूद्ध नविन कायदा भारतीय न्याय संहीता २०२३ मधील किरकोळ संघटीत गुन्हेगारी चे कलम ११२ अन्वये करण्यात आली कारवाई

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक २३/०२/२०२६ रोजी जलालखेडा पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा उमठा (पारधी बेडा), व हिवरमठ, शिवारात मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच जलालखेडा पोलीसांनी वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना माहीती देवुन त्यांच्या मार्गदर्शनात नमुद ठिकाणी जावुन कारवाई केली असता **आरोपी १) सुरज जितेंद्र पवार, वय २५ वर्ष, आणि महीला आरोपी दोन्ही रा. उमठा (पारधी बेडा) ता. नरखेड यांच्या एक गुन्हा नोंद आहे २) दिनेश रामचंद्र बनसरे, आणि महीला आरोपी दोन्ही रा. उमठा (पारधी बेडा) ता. नरखेड यांच्या एक गुन्हा नोंद आहे. ३) अजय शेरू भोसले, वय २५ वर्ष, आणि माहीला आरोपी दोन्ही रा. उमठा (पारधी बेडा) ता. नरखेड यांच्या एक गुन्हा नोंद आहे. ४) जिगर जगदीश पवार, वय २५ वर्ष, आणि आरोपी गाना शेरील भोसले, वय ३० वर्ष, दोन्ही रा. हिवरमठ ता. नरखेड यांच्या एक गुन्हा नोंद आहे.** नमुद आरोपी हे संघटीतरित्या मोहाफुलाची गावठी तयार करून विक्री करतात. पोलीसांनी पंचासमक्ष १) ३५० लिटर मोहाफुल सडवा रसायन ,२) २३० लिटर मोहाफुल गावठी दारू ३) एक लोखंडी ड्रम, प्लास्टिक ड्रम इतर साहित्य असा एकुण ३८,२५०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ४ गुन्हा नोंदविण्यात आले आहे.

**नमुद आरोपी हे टोळीने अवैधरित्या हातभट्टी लावुन मोहाफुल दारू गाळतात आणि विक्री करीत असतात. त्यांच्यामुळे परीसरात अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. त्यामुळे सदर गुन्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात जलालखेडा पोलीसांनी भारतीय न्याय संहीता कलम ११२ ( किरकोळ संघटीत गुन्हेगारी ) अशी कलम वाढ करणे बाबत प्रस्ताव श्री.पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या कडे सादर केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास जलालखेडा पोलीस करीत आहे.**





## खुन करणाऱ्या आरोपीला तात्काळ अटक
## सावनेर पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २२/०२/२०२६ रोजी फिर्यादी नामे श्रीमती रागीनी पालकराम उर्फ हलकराम नागेश्वर, वय ५० वर्षे, रा. किल्हापुरा वार्ड क्र.०१ पाटनसावंगी ता. सावनेर यांनी तक्रार दिली की, फिर्यादीचा मुलगा आरोपी नामे सुर्यकांत पालकराम उर्फ हलकराम नागेश्वर याने मृतक फिर्यादीचा भाऊ केसरी जग्गु कावडे, वय ४५ वर्ष, रा. आरामशीन जवळ पाटनसावंगी याचे सोबत दारू पिवुन झालेलया भांडणात आरोपीने मृतकास लोखंडी संबल व लोखंडी कुदळ याने वार करून जिवानीशी ठार केले. अशा फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपीविरूद्ध पोस्टे सावनेर येथे खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला.

**सावनेर पोलीसांनी नमुद गुन्हयातील आरोपी नामे सुर्यकांत पालकराम उर्फ हलकराम नागेश्वर, वय २३ वर्षे, रा. किल्हापुरा, वार्ड क्र. ०१ पाटनसावंगी ता.सावनेर याला तात्काळ अटक केले. नमुद आरोपीला मा न्यायालयाने दिनांक २५/०२/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७७० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७७० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३२ आरोपी अशा एकुण ६७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५५ आरोपी, पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३८ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २३ आरोपी अशा एकुण १४९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ८१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १९३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.)**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने